Shriniwas Hemade M.A. Ph.D.
Associate Professor& Head, Department Of Philosophy, Co-Ordinator: Department of Journalism,
S.N. Arts, D.J.M. Commerce & Science College, Sangamner 422 605, Dist. Ahmednagar
Email - madshri@hotmail.com, cell: 9226563052, Website: http://shriniwashemade.yolasite.com/
प्रकाशन : ब्रेन टॉनिक, वर्ष 2, अंक 11-12, ऑक्टो.-नोव्हे. 2007, संपादक : सौ. मंगला रमेश वरखेडे, नाशिक.

# खलील जिब्रानशी मैत्री

**श्रीनिवास हेमाडे**

खलील जिब्रान हा विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील जागतिक किर्तीचे कवी व पौर्वात्य जीवनदर्शनाचे प्रभावी भाष्यकार म्हणून जगाला परिचित आहे. जिब्रानने खऱ्या ख्रिस्ती तत्वज्ञानाचे सम्यक दर्शन आपल्या लेखणीच्या व्दारे घडविले. तो समग्र मानवतेचा विचार करणारे होता. जिब्रानने अरबीत आणि इंग्रजीत ग्रंथरचना केली, असली तरी *अरबी भाषेतील प्रतिनिधीक कवी* म्हणून त्यास ओळखले जाते.



जिब्रान अरबी मातृभाषा असलेला ख्रिस्ती होता. लेबॅनॉनचा अमर प्रेषित आणि आपल्या युगातील महापंडित म्हणून जगाला परिचित असलेल्या जिब्रानचा जन्म लेबॅनॉनमधील बशरा या गावी 6 डिसेंबर 1883 रोजी झाला. लेबॅनॉनमधील बहुसंख्या ख्रिश्चन मेरॉनाईट पंथाचे आहेत. जिब्रानच्या पित्याचे नाव खलील जिब्रान आणि आईचे नाव कामिला रहमी असे होते. (खलील म्हणजे खरामि आणि जिब्रान म्हणजे जोडणारा, आत्म्यांना रोगमुक्त करणारा किंवा समाधान देणारा आणि कामिका, म्हणजे पूर्णावस्थेला पोचलेली, रहमी म्हणजे दया)

जिब्रानला लहानपणापासून कविता करण्याचा चित्रे काढण्याचा छंद होता. तो समवयस्क सामान्य मुलांशी कधीच समरस झाला नाही. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत बशऱ्याच्या शाळेतच जिब्रानचे प्राथमिक शिक्षण झाले. शाळेत तो अरबी व सिरीयँक शिकला. घरी त्याला फ्रेंच व इंग्रजी भाषा शिकविण्यात आली. वयाच्या बाराव्या वर्षी इ.स.1895 च्या जुनमध्ये जिब्रानची आई कामिला रहमी मुंलाना घेऊन बोस्टनला स्थायिक झाली. जिब्रान बोस्टनच्या पब्लिक स्कुलमध्ये जाऊ लागला. इ.स.1897 मध्ये जिब्रान परत बैरुतला गेला. मेरॉनाइट महापंडित बिशप जोसेफ वेब्स यांनी स्थापन केलेल्या *'मद्रसतूल हिकमत'* (ज्ञानाची शाळा) या शाळेत तो दाखल झाला. या शाळेत जिब्रानने पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर जिब्रान इ.स.1901 मध्ये बाहेर पडला. 'अल नबी' (प्रेषित The Prophet) या आपल्या विश्वविख्यात ग्रंथाची पहिली अरबी प्रत त्याने याच काळात तयार केली. या नंतर त्याने साहित्य व तत्वज्ञानाला वाहिलेल्या *"अल हकीकत"* (सत्य) या मासिकाचे संपादन केले. कवी व शास्त्रज्ञांची चित्रे काढली. एक सुभाषित संग्रह तयार केला. यानंतर तो ग्रीस, इटली, स्पेन असा प्रवास करीत पॅरिसला पोचला. इ.स.1901 ते 1903 तो पॅरिसमध्ये राहिला.याकाळात त्याने चित्रकलेचे शिक्षण घेतले. नंतर जिब्रानने *"अल अरवाह अल मुतमर्रदा"* (बंडखोर आत्मे) आणि *"दमानु व इप्तिसामतु "* (अश्रु व हसू) ही पुस्तके लिहली. यांनतर बहिणीसाठी तो बोस्टनला गेला. बोस्टनमध्ये त्याने पुष्कळ चित्रप्रदर्शने भरविली. नंतर इ.स.1908 ते 1910 या काळात पॅरिसमधील प्रसिध्द शिल्पकार रोदँ यांच्याकडे चित्रकला शिकण्यात घालविली. पॅरिसमधील त्यांची चित्रप्रदर्शने भरली. इ.स.1922 ते 1931 ही महत्वाची वर्षे जिब्रानने न्युयॉर्कमध्ये घालविली.

The Prophet या ग्रथांची इंग्रजी प्रत त्याने याच काळात तयार केली. या पुस्तकाची भाषा सुधारण्यामध्ये मेरी स्कूल या स्त्रीची खूप मदत झाली. 1923 मध्ये ते न्यूयॉर्कमध्ये प्रसिद्ध झाले. त्यानंतर इ.स.1926 साली *"सँड अँड फोम"* (वाळु व फेस ) इ.स.1928 मध्ये *"जीझस द सन ऑफ मॅन"* (मानवपुत्र येशु) 1931 साली *"दि अर्थ ऑफ गॉडस"* (भूदेव) ही प्रसिध्द झाली. संस्कारसंपन्न कलाजीवन जगणाऱ्या जिब्रानने 10 एप्रिल 1931 रोजी इहलोकातून निरोप घेतला !

कवी, चित्रकार कथालेखक देशभक्त, तत्वज्ञ वगैरे अनेक नात्यांनी जिब्रानची प्रतिभा विकसित झाली. त्याचे व्यक्तिमत्व गुंतागुंतीचे पण संपन्न होते. तो एक अस्वस्थ आत्मा होता.

पौवित्र्य देशातील प्राचीन ऋषींनी आत्म्याचे जे सामर्ध्य ओळखले होते ते आधुनिक काळात ओळखणाऱ्या अगदी थोडक्या महाकवींमध्ये जिब्रानची गणना करावी लागते, तो म्हणत असे, "आत्मा हा स्थळकाळाहून अधिक सामर्थ्यवान आहे, तो सागराहून खोल व ताऱ्याहून उंच आहे. खरी महत्वाची गोष्ट ही की आत्मा मूलत: मुक्त आहे. याचा अर्थच असा की प्रत्येक व्यक्तीचा धर्म वेगवेगळाच राहणार".

Shriniwas Hemade M.A. Ph.D.
Associate Professor& Head, Department Of Philosophy, Co-Ordinator: Department of Journalism,
S.N. Arts, D.J.M. Commerce & Science College, Sangamner 422 605, Dist. Ahmednagar
Email - madshri@hotmail.com, cell: 9226563052, Website: http://shriniwashemade.yolasite.com/
प्रकाशन : ब्रेन टॉनिक, वर्ष 2, अंक 11-12, ऑक्टो.-नोव्हे. 2007, संपादक : सौ. मंगला रमेश वरखेडे, नाशिक.



जिब्रानच्या लिखाणाचा व चित्रांचा अर्थ कळण्यासाठी त्यांच्या तत्वज्ञानातील आत्म्याचे स्थान जाणणे आवश्यक आहे. आत्मा मानला की, आत्म्याचे अमरत्व मान्य करणे क्रमप्राप्त असते. यामुळेच जिब्रान म्हणे की, मानवी जीवनाला अंत नाही. आपण अनंत आहेत पुनर्जन्माची कल्पना जिब्रानने गौतम बुध्दाकडून किंवा भारतीय साहित्यातून घेतली असल्याची शंका श्री. हबीब अशुअर यांनी व्यक्त केली आहे. (यहुदी, ख्रिस्ती व इस्लामी प्रेषितांनी पवित्र केलेल्या भुमीत जन्मलेल्या जिब्रानचा पिंड अध्यात्मिक होता, याच आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही, परंतु या तिन्ही परंपरात नसलेल्या पुनर्जन्मावर त्याचा विश्वास असावा, यांचे अनेकांना आश्चर्य वाटते.) मिखाईल नईमीने लिहिलेल्या जिब्रानच्या स्मृतीलेखांनुसार पुनर्जन्माची कल्पना लेबानॉनच्या स्थानिक जनतेत पूर्वीपासून दृढमूल झालेली असावी. जिब्रानच्या साहित्यात *पुनर्जन्म* हा शब्द फारसा आढळत नाही. त्याऐवजी तो *जीवनाचे सातत्य* हा शब्द वापरतो ''प्रॉफेट'' मधील शेवटच्या वाक्यावरून हे सूचित होते. ''प्रॉफेट'' चा निवेदक नायक अल मुस्तफा ऑरकालीस नगरातील रहिवाशांना उद्देशून म्हणतो. ''आणखी थोडा वेळ वायुवर एक क्षणभर विश्रांती आणि एक अन्य माता मला धारण करील'' पुनर्जन्माचा सिध्दांत मानल्यानंतर कर्मविपाक सिद्धांत मानणे अपरिहार्य व क्रमप्राप्त ठरते. जे काही घडते त्यामागे काहीतरी कारण असते आणि त्यात ईश्वरी हेतू असतो असतो, असे जिब्रानला वाटे पौर्वात्य विचार सरणीचा त्याच्यावर पगडा होता.

संपन्न सांस्कृतिक परंपरा असलेल्या राष्ट्राला भोगाव्या लागणाऱ्या गुंलामगिरीची दु:खे जिब्रानने निर्भयपणे जगासमोर मांडली होती.जपान वगळता सारा पौर्वात्य समाज मरगळला होता जीर्ण झाला होता. त्यामुळे त्यात जडता भरुन राहिली होती. जिब्रानने या जडतेवर कोरडे ओढले. त्यामुळे पौर्वात्य देशात समाज प्रबोधनाचे कार्य करणाऱ्यांना जिब्रान विशेष प्रिय झाला आसावा. जिब्रानवर उपनिषदांचाही प्रभाव होता. तसेच नीत्शेचाही प्रभाव होता. (तो नंतर ओसरला)

भारतातील जिब्रानभक्तांमध्ये प्रामुख्याने तथाकथित गांधीवादी मंडळीचाच समावेश असल्याचे आढळते. याचे कारण असे की, गांधीविचारांशी जिब्रानच्या विचारांचे पुष्कळच साम्य होते. एकेकाळी भारतीयांना जिब्रानविषयी एक अदभुत आकर्षण व आपलेपणा वाटत होता. गांधीजीच्या मार्गदर्शनाखाली चाललेल्या सत्याग्रह काळात तुरुंगामध्ये जिब्रानच्या सांहित्याचे गंभीरपणे अध्ययन केले जात होते. गांधीजीप्रमाणेच जिब्रानला यांत्रिक संस्कृतिचा तिटकारा होता. यंत्रामुळे मानव निसर्गापासून दुर जातो असे त्यांचे मत होते. तो मानवाला भुमिपुत्र माने. यंत्रामुळे हस्तकलेसारखे जुने, मौल्यवान, व पारंपारिक काही तरी हरवले जात आहे. असे त्याला वाटे. जिब्रानचा स्वत:चा असा कोणताच वाद नव्हता. तो खऱ्या अर्थाने मुक्त मानव होता. तो जीवनावादी कर्मयोगी होता. कला व जीवन यांचा सुदंर समन्वय त्याने केला. लेखणीच्या साहाय्याने राजसत्तेशी व धर्मसत्तेशी झुंज होणारा तो निधडा लढवय्या होता. जीवनाच्या गहन रहस्यांचा शोध घेणारा तत्वज्ञ व निर्भेळ कलानिर्मिती करणारा सौदर्योपासक होता. *बंडखोर आत्मे, तुटलेले पंख, मानवपुत्र येशू* या त्याच्या पुस्तकातून त्याची भूमिका स्पष्ट होते. सौंदर्यापलीकडे धर्म व विज्ञान नाही असे त्याचे मत होते. पाश्चात्य संस्कृतीतील यांत्रिकता व बाजारुपणा यांचा जिब्रानला तिरस्कार वाटे. पौर्तात्य संस्कृतिकतील हजगर्जीपणा व दिरंगाई यांचाही तिटकारा त्याला वाटे. त्याला पौर्वात्य संस्कृतिचा गाभा कितीही प्रिय असला. तरी तिच्या भौतिक अंगाविषयी तो असंतुष्ट होता.

जिब्रानला जागतिक किर्ती, मिळवून देणारे त्याचे पुस्तक म्हणजे *प्रेषित* (The Prophet) हे होय. The Prophet मांडणीवर नीत्शेच्या सुप्रसिध्द ''दस स्पेक इरतुष्ट्रा'' या पुस्तकाराचा प्रभाव पडलेला स्पष्ट दिसतो. जिब्रानच्या प्रेषित मधील अल मुस्तफा आपले विचार लोकांसमोर मांडतो. अल मुस्तफाने जहाजाची प्रतीक्षा करण्यात बारा वर्षे घालविली. ऑरफालीझ नगरीतील अलमित्रा या स्त्रीशी तो बोलतो. या संवादात पौर्वात्य देशातील पैगंबर साधुसंत व सुफी यांच्या विवेचन शैलीचे अनुकरणही जिब्रानने केले आहे. The Prophet मध्ये त्याने मानवी जीवनातील काही प्रमुख प्रश्नांचा आपल्या विशिष्ट काव्यपूर्ण शैलीत सूत्ररुपाने ऊहापोह केला

Shriniwas Hemade M.A. Ph.D.
Associate Professor& Head, Department Of Philosophy, Co-Ordinator: Department of Journalism,
S.N. Arts, D.J.M. Commerce & Science College, Sangamner 422 605, Dist. Ahmednagar
Email - madshri@hotmail.com, cell: 9226563052, Website: http://shriniwashemade.yolasite.com/
प्रकाशन : ब्रेन टॉनिक, वर्ष 2, अंक 11-12, ऑक्टो.-नोव्हे. 2007, संपादक : सौ. मंगला रमेश वरखेडे, नाशिक.



आहे. यात प्रेम, लग्न, बालके, खानपान, श्रम, हर्ष, लोभ, मैत्री, सुख, दु:ख, सौंदर्य, धर्म, अपराध व शासन क्रयविक्रय घरे, कायदे, विवेक, वासना, साधुता व दुष्टता, संभाषणकला, वस्त्रे इत्यादी एकूण सव्वीस विषयांवर अल् मुस्तफा या प्रेषिताने किंवा मं.पैगंबराने दिलेली छोटीछोटी प्रवचने आहेत. मुस्तफा म्हणजे पवित्र, निवडक, निर्मळ, शुध्द स्वच्छ. हा अल मुस्तफा ऑरफालीज नावाच्या नगरात आपल्या जन्मभुमीला परत नेणाऱ्या जहाजाची बारा वर्षे प्रतीक्षा करीत होता. (आरफालीज म्हणजे देवलोक). अखेर बाराव्या वर्षी आपल्याला घेऊन जाणारे जहाज किनाऱ्याकडे येत असलेले त्याला दिसले. आणि तो समुद्राकडे निघाला त्यावेळी ऑरफालीझ नगरातील स्त्रीपुरुषांनी त्याला घेरले. आणि त्याने आणखी काही दिवस आपल्यामध्ये काढावेत म्हणून ते त्याची विनवणी करु लागले. परंतु त्याचा निश्चय ढळत नाही असे पाहिल्यावर ते लोक त्याला म्हणाले "आम्हाला सोडून जाण्यापुर्वी आम्हाला काहीतरी सांगावसं आणि आपल्या परम सत्याच्या भांडारातून आम्हाला काहीतरी द्यावस अशी आमची तुला विनंती आहे. आम्ही ते सत्य आमच्या मुलांबालकांना देऊ. ते विचार अमर राहतील. अल्मित्रा या महिलेनेही हीच विनंती केली. आणि मग क्रमाक्रमाने वेगवेगळया व्यवसायातील लोकांनी अल मुस्तफास वेगवेगळे प्रश्न विचारले. त्याने सूत्ररुपाने त्यांची उत्तरे दिली. या प्रश्नोत्तराचा छोटेखानी संग्रह म्हणजेच *प्रेषित* हा ग्रंथ होय.

मैत्री:-

एक तरुण मुलगा खलील जिब्रानला म्हणला, आम्हाला मैत्रीविषयी काही सांगा अल् मुस्तफाने उत्तरे दिली ती पुढीलप्रमाणे,

1) तुमचा मित्र म्हणजे तुमच्या गरजांचे उत्तर होय.
2) मित्र म्हणजे तुम्ही ज्या भूमीत प्रेमाने पेरणी करता आणि आभार मानून पिकविता अशी भूमी होय,
3) जेव्हा तुमचा मित्र त्याच्या मनातले बोलतो तेव्हा तुमच्या स्वत:च्या मनातल्या नकाराला तुम्ही घाबरु नका व होकार रोखून धरु नका.
4) तुमचा मित्र मौन बाळगतो तेव्हा त्याच्याशी बोलण्याची तुम्ही इच्छा करु नका. कारण मैत्रीत न बोलता सर्व विचार इच्छा अपेक्षा या वाटून घ्यायच्या असतात. मैत्रीचा आनंद वाटून घ्यायचा असतो.
5) जेव्हा तुम्ही मित्रापासून वेगळे व्हाल, (वियोग होईल) तेव्हा दु:ख करु नका, कारण तुम्ही मित्रांतल्या ज्या गुणावर सर्वात जास्त प्रेम करता, तो गुण त्याच्या अनुपस्थितीत स्पष्ट होईल. ज्याप्रमाणे डोंगर चढणाऱ्याला पायथ्यापासूनच डोंगर स्पष्ट दिसतो. आत्मविकासाशिवाय मैत्रीला दुसरा कुठला हेतू असू नये.
6) तुमच्याजवळ जे सर्वोतम आहे ते मित्राला द्या. तुमची वाट ओसरणे त्याला माहित असेल तर पुरही माहित होऊ दे. (आवेश व शांतता दोन्ही माहित होऊ दे.)
7) अनेक क्षण (म्हणजे वेळ) घालविण्यासाठी मित्राचा उपयोग करुन घेऊ नका,
8) मित्राचा उपयोग जगण्यासाठी, काहीतरी कार्य करण्यासाठी करा
9) मित्र आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी असतो, आपला रितेपणा नाही.
10) मैत्रीची गोडी हास्यविनोदाने, आनंद वाटून घेण्याने वाढते. छोट्या छोट्या दंवबिंदुतून रम्य सकाळ दिसते आणि आपण ताजेतवाने होतो.